# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## SAVITRIBAI PHULE PUNE UNIVERSITY

(Formerly University of Pune)

Website: www.unipune.ac.in, E-mail Id.:ar.coordination@pun.unipune.ac.in, coe@unipune.ac.in,Phone No.: 020-25621440


### परिपत्रक क्र. २२८ /२०२६

विद्यापीठाच्या पदवी व डिप्लोमा उन्हाळी सत्र २०२६ मधील परीक्षांसंदर्भात पुढीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत: (संदर्भ : परिपत्रक क्र. ५०/२०२५, दि. ११/०३/२०२५)

१. सर्व डिप्लोमा मधील संबंधित अभ्यासक्रमांच्या प्रॅक्टिकल परीक्षा महाविद्यालय स्तरावर आयोजित करण्यात याव्यात. संबंधित महाविद्यालयांच्या प्राचार्यांनी प्रचलित नियमांनुसार प्रॅक्टिकल परीक्षांचे नियोजन दि. २५ एप्रिल २०२६ ते दि. ०४ मे २०२६ या कालावधीत घेण्यात याव्यात.

२. २०१७ पॅटर्नमधील प्रथम वर्षासाठी खालील अभ्यासक्रमांच्या परीक्षा घेण्यात याव्यात:

- B.A. LL.B. 2017 Pattern
- B.B.A. LL.B. 2017 Pattern
- LL.B. 2017 Pattern

सदर परीक्षा संबंधित महाविद्यालयांनी प्रचलित नियमांनुसार तसेच अनुशेषित (Backlog) परीक्षांच्या प्रचलित तरतुदीनुसार महाविद्यालय स्तरावर आयोजित कराव्यात.

३. २०१७ व २०२३ मधील Mix Pattern B.A. LL.B., B.B.A. LL.B. तसेच LL.B. आणि Additional विषयांच्या परीक्षा महाविद्यालय स्तरावर आयोजित कराव्यात.

४. Additional Equivalence Subject परीक्षेबाबत आवश्यक ती कार्यवाही प्रचलित नियमांनुसार महाविद्यालय स्तरावर करून विद्यार्थ्यांचे गुण संबंधित विद्यापीठाच्या Online Portal वर भरण्यात यावेत.

५. N+2+1 विद्यार्थ्यांसाठी २०१७ Pattern अंतर्गत असलेल्या अनुशेषित (Backlog) विषयांच्या परीक्षा April / May Examination Time Table 2026 नुसार त्याच वेळापत्रकाप्रमाणे घेण्यात याव्यात.

वरील सर्व बाबींविषयी महाविद्यालय/संस्थेच्या प्राचार्यांनी आवश्यक ती कार्यवाही करून विद्यार्थ्यांना, शिक्षकांना व इतर संबंधितांना याची योग्य प्रकारे माहिती द्यावी.

याबाबत महाविद्यालयांचे/परिसंस्थांचे प्राचार्य/संचालक यांना कळविण्यात येते की, त्यांनी सदर पत्रक संबंधित महाविद्यालयांचे/परिसंस्थांचे विद्यार्थी, शिक्षक व इतर घटकांच्या निदर्शनास आणून द्यावे.

(प्रा.डॉ.प्रभाकर देसाई)
**प्रभारी संचालक**
**परीक्षा व मूल्यमापन मंडळ**

परीक्ष समन्वय कक्ष, परीक्षा विभाग
गणेशखिंड, पुणे ४११ ००७.
जा.क्र. ५४६, दिनांक: २४.०४.२०२६

**प्रति,**
**मा.प्राचार्य/मा.संचालक, सर्व संबंधित संलग्नित महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था**
**पुणे जिल्हा, अहिल्यानगर जिल्हा, नाशिक जिल्हा व दादरा आणि नगर हवेली केंद्रशासित प्रदेश**

**प्रत माहितीसाठीः**
१) मा.प्रभारी अधिष्ठाता, सर्व विद्याशाखा, प्रस्तुत विद्यापीठ.
२) उपकुलसचिव, छाननी व तालिनीकरण कक्ष, परीक्षा विभाग.
३) उपकुलसचिव, गोपनीय व बारकोड कक्ष, परीक्षा विभाग.
4) उपकुलसचिव, गोदाम कक्ष, परीक्षा विभाग.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
गणेशखिंड, पुणे - ४११००७
Savitribai Phule Pune University
Ganeshkhind, Pune - 411007

दूरध्वनी क्रमांक : ०२०– २५६२११५६/५७/५९
Telephone No. : 020-25621156/57/59
ईमेल/ Email : approval@unipune.ac.in

शैक्षणिक विभाग (मान्यता कक्ष)
Academic Section (Approval Cell)
संकेतस्थळ/ Website: www.unipune.ac.in

संदर्भ क्र : सीबीएच/९५

दिनांक ११.०३.२०२५:

## परिपत्रक क्र. ५० /२०२५

विषय:– मानवविज्ञान विद्याशाखेंतर्गत विधी अभ्यासमंडळाअंतर्गत पाच वर्षीय बी.ए.एल.एल.बी./ बी.बी.ए.एल.एल.बी. आणि तीन वर्षीय एल.एल.बी. या पदवी अभ्यासक्रमांच्या २०१७ पॅटर्नमधून CBCS (2023) पॅटर्नमध्ये (2017 pattern to the CBCS pattern) समकक्षतेच्या नियमांमध्ये सुधारणा करणेबाबत.....

विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार कळविण्यात येते की, मानवविज्ञान विद्याशाखेंतर्गत विधी अभ्यासमंडळाअंतर्गत पाच वर्षीय बी.ए.एल.एल.बी./बी.बी.ए.एल.एल.बी. आणि तीन वर्षीय एल.एल.बी. या पदवी अभ्यासक्रमांच्या २०१७ पॅटर्नमधून CBCS (2023) पॅटर्नमध्ये (2017 pattern to the CBCS pattern) समकक्षतेच्या नियमांमध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्यास शैक्षणिक वर्ष २०२३–२४ पासून मान्यता देण्यात येत आहे.

१. २०१७ पॅटर्नमधून सीबीसीएस २०२३ पॅटर्नमध्ये स्थलांतरित होणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी महाविद्यालयांनी समकक्षता परीक्षा घेऊन निकाल विद्यापीठास सादर करावा.

२. महाविद्यालयांनी खालील बाबींची जबाबदारी स्वीकारावी :
   अ) वेळापत्रक तयार करणे
   ब) प्रश्नपत्रिका तयार करणे
   क) परीक्षा आयोजन
   ड) उत्तरपत्रिका मूल्यांकन
   इ) गुणपत्रक परीक्षा विभागास पाठवणे

मा. प्राचार्य, सर्व संबंधित संलग्न विधी महाविद्यालये यांना विनंती की, सदर परिपत्रकाचा आशय सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून द्यावा.

11/3/2025

गणेशखिंड, पुणे– ४११००७
जा. क्र. :– सीबीएच/ ९५
दिनांक :– ११/०३/२०२५

(स. द. डावखर)
उपकुलसचिव

प्रत माहितीसाठी व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी:—

१. मा. अधिष्ठाता, मानवविज्ञान विद्याशाखा, प्रस्तुत विद्यापीठ
२. मा. संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ, प्रस्तुत विद्यापीठ
३. मा. प्राचार्य, सर्व संबंधित संलग्न विधी महाविद्यालये
४. मा. उपकुलसचिव, (संलग्नता कक्ष), प्रस्तुत विद्यापीठ
५. मा. उपकुलसचिव, शैक्षणिक पात्रता विभाग, प्रस्तुत विद्यापीठ

मा. विद्यापरिषद ठराव क्र — ब ०६पीए/०६/२०२५, दि. १७ जानेवारी, २०२५